**P.R.O Office ,Crime Branch ,Pimpri Chinchwad**
**Address:- Office Of The Commissioner Of Police ,**
**Premlok Park Chinchwad,**
**Maharashtra - 411033**

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट** **दिनांक - २६/०७/२०२२**

**दि.२५/०७/२०२२ रोजी रात्रौ ००.०० वा ते २४.०० वा पर्यत दाखल गुन्हे**

**<u>भाग १ ते ५ चे गुन्हे</u>**

१.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | देहुरोड ५०१/२०२२ भादंवि क३९२ प्रमाणे |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दिनांक २४/०७/२०२२ रोजी १८/०० वा चे सुमारास देहुगाव बसस्टॉपवर निगडी बस मध्ये बसताना |
| गुन्हा दाखल | :- | २५/०७/२०२२रोजी १७/०४वा |
| फिर्यादी | :- | महिला फिर्यादी |
| आरोपी | :- | अज्ञात चोरटा |
| तपशिल | :- | नमुद ता वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी हे त्यांचे ओळखीचे लोकांसह देहुगाव येथुन संत तुकाराम महाराज मंदीरातुन दर्शन घेवुन घरी जात असताना बस मध्ये चढत असताना कोणीतरी अज्ञात चोरटयाने फिर्यादी यांच्या गळयातील १,००,०००/- रू किंमतीचे २८ ग्रॅम वजनाचे सोन्याचे गंठण स्वताचे आर्थिक फायदयाकरिता जबरीने हिसकावुन चोरून नेले आहे म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | सपोनि अतिग्रे ७४९८४९३६३६ |

२.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु.रजि.नं. | :- | एमआयडीसी भोसरी ४३७/२०२२ भा.दं.वि.कलम ३९२,३४ प्रमाणे |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि.२५/०७/२०२२ रोजी १९/३० वा. चे सुमारास खंडेवस्ती चौक ते क्रांती चौक सर्व्हिस रोडवर, मोशी, पुणे |
| गुन्हा दाखल | :- | दि.२५/०७/२०२२ रोजी २३/४९ वा |
| फिर्यादी | :- | निलीमा रामचंद्र पाटील वय २५ वर्षे धंदा-नोकरी सध्या रा.जिजामाता हौसिंग सोसायटी,कुंजीरनिवास शरदनगर पुणे मुळ ा.जामणेर,गिरजा कॉलनी भुसावळरोड जि.जळगाव |
| आरोपी | :- | अज्ञात चोरटा |
| तपशिल | :- | वर नमुद तारीख वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी हे पायी चालत स्पाईन चौकातुन राहते घरी येत असताना खंडेवस्ती चौकाचे समोर सर्व्हिस रोडने जात असताना अचानक पाठीमागुन आलेल्या मोटरसायकलवरील दोन इसमांपैकी पाठीमागे बसलेल्या इसमाने फिर्यादी यांचे हातातील २०,०००/- रुपये किं. वनप्लस कंपनिचा नाईन आर मॉडेलचा काळया रंगाचा मोबाईल जबरदस्तीने हिसका मारुन चोरुन नेला आहे,म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोउपनि आर.बी.जाधव९४२३२८६३२३ |

३.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु.रजि.नं. | :- | देहुरोड ५००/२०२२ भादंवि क ३७६ ,३७६ (२)(आय) प्रमाणे |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | ३१/१२/२०२० रोजी पासुन जुलै २०२१ अंदाजे २०/३० वा.` लेखा फार्म येथील ग्राउंडवर , पेन्सिल कॉलनी, शिंदे पेट्रोल पंपाजवळ भाडयाच्या घरात डिसेंबर २०२१ पर्यत |
| गुन्हा दाखल | :- | २५/०७/२०२२रोजी १४/४९वा |
| फिर्यादी | :- | महिला फिर्यादी |
| आरोपी | :- | शक्तीवेल रा. टि सी कॉलनी, विकास नगर देहुरोड, ता.हवेली जि.पुणे याने त्याचे मोबाईल ७०३००२३५३७ **आरोपी अटक नाही** शोध चालु आहे |
| तपशिल | :- | नमुद ता वेळी व ठिकाणी यातील आरोपी याचे फिर्यादी यांच्या घराशेजारी सारखे येणेजाणे असायचे त्या दरम्यान दोघांची ओळख झाली होती . आरोपीने त्याचे मोबाईल **७०३००२३५३७** नंबर वरुन फिर्यादीस फोन करुन प्रपोज केले कि मै तुमको लाईक करता हु , मै तुमसे शादी करणा चाहता हु ,तुम्हारे मनमे क्या है ,क्या तुम मुझसे शादी करोगी क्या असे विचारले असता फिर्यादीने आरोपीस होकार दिला .जुलै २०२१ मध्ये सायंकाळी अंदाजे ८/३० वा. चे सुमारास आरोपी याने लेखा फार्म येथील ग्राउडवर फिर्यादी याचें सोबत शारिरीक संबंध केला होता. तसेच आरोपी याने त्याचे भाडयाने राहते घरी सुध्दा फिर्यादी यांच्यासोबत लग्न करणार असल्याचे सांगुन आरोपी याने फिर्यादी यांचे सोबत वांरवार शारिरीक संबंध ठेवून आरोपीमुळे फिर्यादीस एक तीन महिन्याचा मुलगा झाला आहे म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | मसपोनि गावडे९७६९९००५७७ |

४.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु.रजि.नं. | :- | भोसरी ५९८/२०२२ भा.दं.वि.कलम ३५४,३२३,५०४ प्रमाणे. |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि.२४/०७/२०२२ रोजी २२/१५ वा. चे सुमा. वार्ड क्र.३, रेल्वे बोगदया जवळ, सिध्दार्थनगर, दापोडी पुणे १२ येथे फिर्यादी यांचे घरासमोर |
| गुन्हा दाखल | :- | दि.२५/०७/२०२२ रोजी १९/००वा |
| फिर्यादी | :- | महिला फिर्यादी |
| आरोपी | :- | गणेश अशोक पवार वय अं. ४० वर्षे, रा. बापूकाटे चाळ, दापोडी पुणे **आरोपी अटक नाही** |
| तपशिल | :- | वर नमुद केले ता.वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी या त्यांचे मुलांसोबत असताना यातील आरोपी फिर्यादी यांचा मेव्हणा फिर्यादी यांचे घरी येवून माझी पत्नी तुमचे घरी आली आहे काय अशी विचारणा केली असता फिर्यादी यांनी त्यास नाही असे सांगीतले व काय झाले असे विचारले असता यातील आरोपीने चिडून जावून फिर्यादी यांना शिवीगाळ करत हाताने मारहाण करण्यास सुरवात केली असता फिर्यादी यांची आई मध्ये आली असता आरोपीने फिर्यादी व फिर्यादी यांची आईस शिवीगाळ करून हाताने मारहाण करून फिर्यादी यांचे आईचे अंगावरील ब्लाऊज फाडून त्यांचे मनास लज्जा उत्पन्न केली आहे म्हणून |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोलीस उप निरीक्षक भास्कर ९७६७९८६९४२ |

५.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु.रजि.नं. | :- | हिंजवडी ६९६/२०२२ भा.द.वि.कलम - भा. दं. वि. कलम ३५४(ड),५००,५०४,५०६(२) प्रमाणे |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि. ०९ एप्रिल २०२२ ते २५/०७/२०२२ रोजीचे दरम्यान ब्ल्यू रिज सोसायटी बी-३ फ्लॅट नंबर २१०८ हिंजवडी ता.मुळशी जि.पुणे या ठिकाणी राहणेस असताना तसेच कोड की (Qodequay) टेक्नॉलॉजीस कंपनी, हिंजवडी -माण रोड, हिंजवडी, पुणे व व्हाईट लुक कंपनी, सिटी व्हीस्टा बिल्डींग, खराडी पुणे येथील कंपनीमध्ये |
| गुन्हा दाखल | :- | दि.२५/०७/२०२२ रोजी २३/१४ वा. |
| फिर्यादी | :- | महिला फिर्यादी |
| आरोपी | :- | अनुपम उत्तमकुमार देसाई राहणार- २०२, शिवसदन सोसायटी, ए-विंग चिंचोली बुंदेर रोड मालाड सुंदरनगर मुंबई **आरोपी अटक नाही** |
| तपशिल | :- | यातील फिर्यादी या दिनांक ०९ एप्रील २०२२ ते दिनांक २५/०७/२०२२ रोजीचे दरम्यान ब्ल्यू रिज सोसायटी बी-३ फ्लॅट नंबर २१०८ हिंजवडी ता.मुळशी जि.पुणे या ठिकाणी राहणेस असताना तसेच कोड की (Qodequay) टेक्नॉलॉजीस कंपनी, हिंजवडी -माण रोड, हिंजवडी, पुणे व व्हाईट लुक कंपनी, सिटी व्हीस्टा बिल्डींग, खराडी पुणे येथील कंपनीमध्ये काम करत असताना तसेच त्यापुर्वी फिर्यादी या राहत असलेल्या कासा रिओ सोसायटी, पलाव्हा, डोंबीवली, मुंबई व प्रिस्टीन प्रो लाईफ सोसायटी, फेज-३, सी-२०६, शंकर कलाटे नगर, सयाजी हॉटेल जवळ, वाकड पुणे येथे राहत असताना यातील आरोपीने फिर्यादी यांचेवर पाळत ठेवुन, फिर्यादी यांची गोपनीय माहिती काढुन, पाठलाग करुन, फिर्यादी यांना सतत फोन करुन, फिर्यादी यांचे गुगल पे चे अकाऊंटला मेसेज करुन, फिर्यादी या काम करत असलेल्या कंपन्यामध्ये वारंवार फोन करुन फिर्यादीस मानसीक त्रास देवुन, फिर्यादीचे सहकारी यांचेकडे फिर्यादीबाबत विचारणा करुन, फिर्यादी काम करत असलेल्या कंपनीस फिर्यादी बद्दल चुकीची माहिती सांगुन त्यांची बदनामी केलेने, तसेच फिर्यादीस वाईट वाईट शिवीगाळ करुन, जिवे ठार मारण्याची धमकी दिली म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | छाया बोरकर, म.पोलीस उप- निरीक्षक,९५५२१११३१०० |

६.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु.रजि.नं. | :- | वाकड ६४६/२०२२ भा.दं.वि.कलम ३०४(II), ३२६, ३२४,३२३,१४३,१४७,१४८,१४९ |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि.२५/०७/२०२२ रोजी रात्रौ ०१/३० वा.ते अंदाजे ०२/०० वा. चे सुमारासद बार हिस्ट हॉटेल, द अड्रेस कमर्शियल, भुजबळ चौक,वाकड, पुणे याठिकाणी. |
| गुन्हा दाखल | :- | दि.२५/०७/२०२२ रोजी २३/४९ वाजता |
| फिर्यादी | :- | मनोजकुमार बापुसो गोईलकर, वय-२४ वर्षे धंदा-नोकरी रा.गणेश रेसीडेन्सी फ्लॅट नं.६, विश्रांतवाडी चौकाजवळ, विश्रांतवाडी, पुणे मुळपत्ता- शिवतिर्थ कॉलनी, गणेशनगर, कुपवाड रोड मिरज, सांगली |
| आरोपी | :- | द बार हिस्ट हॉटेलचे मालक, मालकिण, बाऊंसर, बार टेंडर, डीजे व मॅनेजर नामे गजानन खरात **आरोपी अटक नाही** |
| तपशिल | :- | वर नमुद तारखेस वेळी व ठिकाणी यातील नमुद आरोपी याने यांनी बेकायदेशीर जमाव जमवुन, यातील फिर्यादी व फिर्यादी यांचा मित्र अभय गोंडाने यांस खुर्च्यानी मारहाण करुन जखमी केले. तसेच सर्वानी मिळुन फिर्यादी व फियादीचे मित्रास लाथा बुक्क्यांनी मारहाण करुन त्यां दोघांना गंभीर जखमी केले असल्याने फिर्यादीचा मित्र अभय गोंडाने याने सर्वाच्या आणखी माराला घाबरुन त्याने भितीपोटी जीव वाचवण्यासाठी त्याच मजल्यावरील पलीकडच्या बाजुने दुस-या मजल्यावरुन खाली उडी मारली असता, त्याचे डोके फुटुन गंभीर जखमी झाल्याने त्याला जखमी अवस्थेत उपचार कामी बिर्ला हॉस्पीटल व त्यानंतर ससुन हॉस्पीटल मध्ये दाखल करण्यात आले होते. परंतु ससुन हॉस्पीटलमध्ये उपचारादरम्यान त्यास तेथील डॉक्टरांनी मयत घोषीत केले. तरी वरील सर्व इसमांनी, पळुन जाण्यासाठी जागा नसल्याचे माहीत असताना, आम्हांस मारहाण केल्याने, जिव जाईल या भितीने मित्र अभय गोंडाने याने उडी मारल्याने त्याचा मृत्यु झाला असुन नमुद आरोपी त्याच्या मृत्युस जबाबदार आहे |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोउपनि दिवटे८६०५१५७१५७ |

७.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु.रजि.नं. | :- | दिघी ३०६/२०२२ भा.द.वि.कलम ३२५, ३२३, ५०४, ५०६, १४३, १४५, १४९ |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | २४/०७/२०२२ रोजी ०१/४५ वा. चे सुाा यातील फिर्यादी यांचे घरांचे समोर कृष्णानगर दिघी ता.हवेली जि.पुणे. |
| गुन्हा दाखल | :- | २५/०७/२०२२ रोजी ०४.१५ वा. |
| फिर्यादी | :- | अभिजीत बाबु शेळके वय ३४ वर्षे धंदा नोकरी रा कृष्णा नगर बी ४ लेन स नं ८१/१/१ दिघी पुणे |
| आरोपी | :- | १)प्रणव पांडुरंग झोरे , २)महिला आरोपी, ३)महिला आरोपी, ४)श्री आखाडे (पुर्ण नाव पत्ता माहीत नाही) ५)महिला आरोपी (पुर्ण नाव पत्ता माहीत नाही) **आरोपी अटक नाही.** |
| तपशिल | :- | यातील आरोपी क्रं ३ यांनी फिर्यादी यांचे विरोधात दिघी पोस्टे येथे ४९८(अ) प्रमाणे गुन्हा दाखल केला होता त्यांचे घरगुती वाद होते .वर नमुद तारखेस वेळी व ठिक्राणी फिर्यादी यांची पत्नी आरोपी क्रं ३ ही फिर्यादी यांचे घराचे गेटजवळ येवुन म्हणाली की माझी मुलगी माझे ताब्यात द्या असे म्हणाले चे कारणावरुन चिडुन जावुन यातील आरोपी मजकुर यांनी फिर्यादीस मारणेस सुरुवात केली. त्यावेळी फिर्यादी यांच्या उजव्या हाताचे दंडावर आरोपी क्रं २ हिने जोरात चावा घेवुन दगडाने डोक्यात ठिकठिकाणी मारुन जखमी केले व पत्नी आरोपी क्रं ३ हिने डावे हाताचे मनगटाजवळ जोराने चावा घेतला व अंगावर नखाने ओरखडले व तिचा भाऊ आरोपी क्रं १ व मामा आखाडे यांनीही फिर्यादीस हाताने लाथाबुक्यानी मारहाण केली. व फिर्यादीस जमिनीवर ढकलुन दिले त्यामुळे उजवे हातास मार लागला आहे. त्यावेळी फिर्यादी यांची आई फिर्यादीस सोडविणेसाठी आली असता आरोपी क्रं २ व ३ हिने फिर्यादीचे आईस हाताने मारहाण करुन वाईट शिवीगाळ करुन जिवे मारणेची धमकी दिली. म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | मसपोनि जोगन ९९२२८४९१०० |

८.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु.रजि.नं. | :- | एमआयडीसी भोसरी ४३६/२०२२ भा.द.वि.कलम ४५४,३८० |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि.२५/०७/२०२२ रोजी १०/०० वा ते १५/३० वाज चे दरम्यान फिर्यादी यांचे राहते घरातून सिध्देश्वर हाऊसिंग सोसा. सेक्टरनं. ४ प्लॉटनं. २७/१७ सतनगर मोश्ी प्राधीकरण |
| गुन्हा दाखल | :- | दि.२५/०७/२०२२ रोजी २३/२९ वा. |
| फिर्यादी | :- | संदीप बबन मांढरे वय ४५ वर्षे धंदा व्यवसाय रा. सिध्देश्वरहाऊसिंग सोसा. सेक्टरनं. ४ प्लॉटनं. २७/१७ सतनगर मोश्ी प्राधीकरण |
| आरोपी | :- | अज्ञात इसम |
| तपशिल | :- | वर नमुद तारीख वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी यांचे राहते घराचे दार कुलूप लावून बंद असताना कोणीतरी अज्ञात इसमांनी दरवाजाचा कडीकोयंडा तोडून त्यावाटे आत प्रवेशकरुन १२ तोळे २ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने , व चांदीचे दागिने असा एकुण ३,७९,५००/- रु किं चा ऐवज घरफोडी करुन चोरुन नेला आहे म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोउपनि ए बी तरंगे ८३२९११९२९४ |

९.

पोस्टे व गु.रजि.नं. :- वाकड ६४१/२०२२ भा.द.वि.कलम- ४०६,४२०,५०६, ३४

गु.घ.ता.वेळ व ठि. :- ऑगस्ट २०२१ ते डिसेंबर २०२१ पर्यंत येशो हॉलीडेझ कंपनी व्हिजन-१ ऑफीस नं. २१४ वाकड पुणे येथेघडला असे.

गुन्हा दाखल :- दिनांक २५/०७/२०२२ रोजी १९/४० वा.

फिर्यादी :- संग्राम कालबा आंधे वय-४५ वर्षे धंदा-टुर्स अॅण्ड ट्रव्हल्स रा. फ्लॅट नं. बी-१ २०२ राधाईनगरीगोविंद गार्डनजवळ पिंपळे सौदागर पुणे

आरोपी :- १)अखिलेश यादव उर्फविकी रा. फ्लॅट नं. ९०२ रुद्राक्ष हौसींग सोयायटीडी विंग पुनावळे
२) महिला आरोपी रा. सदर ३)अजय आर्या रा. मुकाईनगर हिंजवडी ,४) महिला आरोपी रा. सदर
**आरोपी अटक नाही**

तपशिल :- वर नमुद तारखेस वेळी व ठिकाणी यातील आरोपी मजकुर यांनी येशो हॉलीडेझ कंपनीमध्ये ११ टक्के पार्टनरशीप देतो असे आमीष दाखवुन फिर्यादी यांचा विश्वास संपादन करुन गुंतवणुक करण्यास भाग पाडुन कोणताही परतावा न देता धमकीची भाषा करुन फिर्यादी व इतर लोकांची २१,९६,०००/- रु किं ची आर्थिक फसवणुक केली म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- पोउपनि गिरनार९८८१०९७७१९

१०.

पोस्टे व गु.रजि.नं. :- भोसरी ५९९/२०२२, एन.डी.पी.एस .अॅक्ट कलम ८(क),२७,२९ प्रमाणे

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि. २५/०७/२०२२ रोजी १३.१० वा. चे सुमारास भोसरी पोलीस स्टेशन हद्दीत दापोडी, पवना नदीच्या कडेला एस.टी. वर्कशॉपच्या भिंतीच्या बाजुला

गुन्हा दाखल :- दि. २५/०७/२०२२ रोजी १९/३८ वा.

फिर्यादी :- प्रसाद मारुती कलाटे, वय ३३ वर्षे, पोलीस नाईक, ब.नं. १७७९ अंमली पदार्थ विरोधी पथक, गुन्हे शाखा, पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय

आरोपी :- १) समीर जयवंत खैरनार वय २७ वर्ष धंदा मजूरी ,अत्तार विटभटटी,प्रल्हाद काटे यांची चाळ, दापोडी,
२) राकेश सुरेश लाखन वय ३७ वर्षे, धंदा-ड्रायव्हर,रा.गल्ली नं.२मातोश्री अपार्टमेंट, लक्ष्मीनगर, पिंपळेगुरव
३) संदिप ज्ञानेश्वर नरबेकर, वय ३७ वर्षे, रा. एस.टी. रोड, दापोडी,
४) महिला आरोपी रा. निगडी ओटा स्किम येथील सरकारी शाळेच्या पाठीमागील भिंतीलगत.
**सीआरपीसी ४१(१)अ प्रमाणे नोटीस देवुन सोडले**

तपशिल :- वर नमुद तारखेस वेळी व ठिकाणी यातील आरोपी क्रं १ ते ३ यांनी संगणमताने आपले कब्जात ४७५/- रु.किंमतीचा १९ ग्रॅम गांजा व गांजा ओढण्याचे साहित्य किं.रु. २०/- असा एकुण ४९५/- रु.चा माल अनाधिकाराने, बेकायदेशिररित्या जवळ बाळगुन आपले ताब्यातील चिनी मातीचे चिलिममध्ये गांजा भरुन चिलिम तोंडात धरुन त्यातुन येणारा धुर ओढत असताना व सेवन करताना मिळुन आले आहेत. तसेच सदर गांजाची पुडी ही निगडी ओटा स्किम येथील सरकारी शाळेच्या पाठीमागील भिंती लगत असलेल्या आरोपी क्रं ४ हिचेकडुन विकत आणल्याचे सांगीतले आहे. म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- पो.उपनिरि.सपकळ९५६११९५५९९